स्थायी समितीच्या **गुरुवार दिनांक 21–07–2016** रोजी **दुपारी 12–30** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| अ.क्र. | मा. सदस्य/सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|
| 1. | मा. श्री. बंडू उर्फ सुधीर राऊत | सभापती |
| 2. | मा. श्री. राजू भाऊराव नागूलवार | सदस्य |
| 3. | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्या |
| 4. | मा. श्री. जगदीश ग्वालबंशी | सदस्य |
| 5. | मा. श्रीमती संगीता कळमकर | सदस्या |
| 6. | मा. श्री. संजय महाकाळकर | सदस्या |
| 7. | मा. श्री. सुरेश जग्यासी | सदस्या |
| 8. | मा. श्रीमती इफ्तीखर अशरफू | सदस्य |
| 9. | मा. सौ. दिव्या धुरडे | सदस्या |
| 10. | मा. श्री. गणेश उर्फ मुन्ना पोकूलवार | सदस्य |
| 11. | मा. सौ. अश्विनी जिचकार | सदस्या |
| 12. | मा. श्री. अनिल धावडे | सदस्य |
| 13. | मा. सौ. सरिता तिवारी | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |
| 2. | मा. श्री. रामदास गुडधे | सदस्या |
| 3. | मा. श्रीमती कुमूदिनी कैकाडे | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. आर.झेड. सिद्दीकी, अति. आयुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 290:– प्रभाग क्र. 51, येथील रामदासपेठ दगडी पार्क उद्यानात कंम्पाउड भिंत व पायवाटेचे बांधकाम करण्याच्या रू. 69,85,966/– रकमेच्या शासकिय (मुख्यमंत्री निधी) विशेष निधी अंतर्गत करावयाच्या कामास्तव प्राप्त निविदांपैकी निम्नत्तम निविदाकार मे/राजेश कंस्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरावरील निम्नत्तम निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 291</u>ः—** नागपूर महानगरपालिकेच्या विविध विभागाच्या जाहिराती तयार करून वर्तमानपत्र, रेडीओ व टि.व्ही. इ. प्रसार माध्यमांमार्फत प्रसारित करण्यासाठी जाहिरात एजन्सी नियुक्त करावयाची आहे. त्यासाठी निविदा मागविण्यात असता प्राप्त झालेल्या दोन निविदा विचारात घेवून जाहिरात खर्चामध्ये सर्वाधिक ११% सुट देवू करणाऱ्या मे. प्रॉफिट ॲडव्हरटायझर्स (इं.) प्रा.लि. नागपूर यांची निविदा मंजूर करून प्रथम एक वर्षाकरीता कार्यादेश देण्याचा प्रश्न विचारात घेणे. तसेच प्रस्तुत निविदा प्रक्रीया पूर्ण होऊन कार्यादेश देईपर्यंत जून्याच अटी व शर्तीवर विद्यमान एजन्सीला मुदतवाढ देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 292</u>ः—** प्रभाग क्र. 68 नरेन्द्र नगर नाल्याची विविध ठिकाणी भिंत बांधकाम करण्याचे कामास्तव प्राप्त निविदांपैकी श्री. राजेश श्रावण रंगारी यांची मुळ प्राकलनिय राशी रू. ४०,७२,२३५/— पेक्षा ३०.०१ टक्के कमी दरावर असलेली रू. २८,०९,४३५/— (अठ्ठाविस लक्ष नऊ हजार चारशे पस्तीस फक्त) ची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच,

हे काम पद क्रमांक ६१८ (A43901370812) अंतर्गत प्रस्तावित असुन तरतुद मुक्त करण्याचे मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन तसेच, शासन निर्णयानुसार अतिरिक्त सुरक्षा ठेव नियमाप्रमाणे देय असणारी राशी कार्यादेश देण्यापूर्वी भरणा करुन घेणे प्रशासनास बंधनकारक तसेच कामाचा गुणवत्ता तपासणी अहवाल दोन—दोन महिन्यात स्थायी समिती समोर प्रशासनाद्वारे सादर करावा या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 293</u>ः—** नागपूर शहर सिमेंट कॉक्रिट रस्ता बांधकाम फेज—२ मधील पॅकेज क्र. १५ अंतर्गत रस्ता क्र. १८ क्रॅडक रोड—रेल्वे अंडर ब्रिज ते गौळीबार चौक ते ईतवारी स्टेशन रोड प्र्यंत व रस्ता क्र. ३६ सी.ए. रोड वरील दोसर भवन चौक ते क्रॅडॅक रोड पर्यंतच्या कामांऐवजी पुढील प्रमाणे ०७ रस्त्यांचे अंदाजित एकूण रू. १४.७५२ कोटी रकमेच्या मर्यादे पर्यंत खालील नमूद रस्ते प्राधान्यक्रमाने घेऊन ही कामे फेज—२ मध्ये समाविष्ट करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन,

१. माऊंट रोड — तहसील कार्यालय ते एनकेपी साळवे चौक
२. लाल ईमली चौक ते टांगा स्टॅन्ड
३. कोतवाली चौक ते गंगाबाई घाट चौक
४. आझमशहा चौक ते अयाचीत मंदिर.
५. अयाचित मंदिर ते गंगाबाई घाट रोड
६. अग्याराम देवी चौक ते देवरस बिल्डींग विदर्भ प्रिमियर बिल्डींग.
७. गांधी पुतळा चौक ते शहीद चौक

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 294</u>ः—** प्रभाग क्र. 55 येथील लक्ष्मीनगर बुटी ले—आऊट येथील रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या रू. 4839200/— रकमेच्या शासकिय (मुख्यमंत्री निधी) विशेष निधी अंतर्गत करावयाच्या कामास्तव प्राप्त निविदांपैकी प्राकलनीय दरांवर रू. 4839200/— ची निम्नत्तम निविदा मे. पी.एम. ए. यांची निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 295:–** मोर भवन बस स्थानकावरील डांबरीकरण कामास्तव प्राप्त मे. पी.एम.ए. कन्स्ट्रक्शन कंपनी ची यांची निन्मतम निविदा मूळ प्राकलनीय दरापेक्षा ३.५०% अधिकच्या दराची निविद रु. ७५,५३,६०६/– (पंच्यात्तर लक्ष त्रेपन हजार सहाशे सहा रुपये फक्त) च्या निविदेस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 296:–** प्रभाग क्र. ६२ (अ) अंतर्गत महात्मा गांधी नगर, अष्टविनायक कॉलोनी रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेल्या एकूण प्राप्त ०७ निविदापैकी मे. सेठ कन्स्ट्रक्शन कंपनी यांची प्रथम निम्नतम निविदा मुळ प्राकलनीय दरांपेक्षा २.०० प्रतिशत अधिक दराची निविदा राशी रू. ४९,५४,०३१/– रकमेच्या निविदेस फेर मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन कार्यालयाने केलेल्या सुचनेप्रमाणे विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 297:–** प्रभाग क्र. 50 टिंबर मार्केट परिसर येथील रस्त्याचे डांबरीकरण व पेव्हर ब्लॉक लावण्याच्या कामांचे रू. 13784941/– रकमेच्या शासकिय (मुख्यमंत्री निधी) विशेष निधी अंतर्गत करावयाच्या कामास्तव प्राप्त निविदांपैकी प्राकलनीय दरांची मे पी. के. कन्सस्ट्रक्श्न यांची निम्नत्तम निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 298:–** प्रभाग क्र. 56 ब, येथील साई मंदिर भागातील प्रगती कॉलनी छत्रपतीनगर ते गजानन नगर ते नरेंद्रनगर पुलापर्यंत नाला कॉंक्रिट करून दुरूस्ती करणे व नाल्याखालील आर.सी.सी. कॉंक्रिटीकरण करण्याच्या रू. 1,35,72,275/– रकमेच्या शासकिय (मुख्यमंत्री निधी) विशेष निधी अंतर्गत करावयाच्या कामास्तव प्राप्त निविदांपैकी निम्नत्तम निविदाकार मे. दिप कंन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरावरील निम्नत्तम निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 299:–** प्रभाग क्र. 50 येथील इंदिरा नगर नं. 1 व 3 आणि इंदिरा नगर नं. 2 (भुरे मैदान ते अजनी सीमेंट रोड) आणि बारासिंगल परिसर येथील रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या रू. 70,27,321/– रकमेच्या शासकिय (मुख्यमंत्री निधी) विशेष निधी अंतर्गत करावयाच्या कामास्तव प्राप्त निविदांपैकी निम्नत्तम निविदाकार मे./सेठ कंस्ट्रक्शन कंपनी यांची प्राकलनीय दरावरील निम्नत्तम निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन कार्यालयाने केलेल्या सुचनेप्रमाणे विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 300:–** प्रभाग क्र. 55 मधील गोपालनगर, संघमित्रा बुध्द विहार परिसर, मनी लेआऊ, धनगरपुरा वस्ती, उर्वेला कॉलोनी, आंनद नगर परिसर, सुदर्शन वस्ती या भागाचे डांबरीकरण करण्याच्या कामाच्या रू. 4857308/– रकमेच्या शासकिय (मुख्यमंत्री निधी) विशेष निधी अंतर्गत करावयाच्या कामास्तव प्राप्त निविदांपैकी प्राकलनीय रकमेवर निम्नत्तम निविदाकार मे. ग्लोबल इंजिनिअरींग वर्क यांची निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 301**:— प्रभाग क्र. 54 येथील वर्मा लेआऊट येथे विविध ठिकाणी सी.सी. पेव्हमेंट करण्याच्या रू. 29,95,358.64/— रकमेच्या शासकिय (मुख्यमंत्री निधी) विशेष निधी अंतर्गत करावयाच्या कामास्तव प्राप्त निविदांपैकी प्राकलनीय रकमेपेक्षा 0.1% प्रतिशतने कमी दरांची मे/समीर इंटरप्रायजेस यांची निम्नत्तम निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 302**:— प्रभाग क्र. 54 ब, येथील डागा ले आऊट येथे विविध ठिकाणी सी.सी.पेव्हमेंट करण्याच्या रू. 2967176/— रकमेच्या शासकिय (मुख्यमंत्री निधी) विशेष निधी अंतर्गत करावयाच्या कामास्तव प्राप्त निविदांपैकी निम्नत्तम निविदाकार मे. ब्रिजेश मिश्रा यांची प्राकलनीय राशीपेक्षा एक प्रतिशत कमी दराने निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 303**:— प्रभाग क्र. ५९ अ—ब अंतर्गत चक्रधर नगर व जवाहर नगर येथील रस्त्यांचे डांबरीकरणाचे काम करण्याच्या कामास्तव रू. २९,९९,५९०/— च्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 304**:— प्रभाग क्र. ४१ अ महाल येथे पाताळेश्वर रोड ते दक्षिणामुर्ती व डी डी नगर ते कोतवाली पोलीस स्टेशन पर्यंतच्या रस्त्याचे सिमेंटीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त ७ निविदांपैकी मे. रफीक अहमद रियाज अहमद यांची प्राकलनिय दरांपेक्षा २२.८९ टक्के प्रतिशत ने कमी दरांची रू. ५३,९७,२९७/— रकमेची निम्नतम निविदा पुढील अटींवर स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन,

1. त्याचे प्रथम धावत्या देयकातून (22.89 – 15.00) + 2 = 9.87 प्रतीशत राशी ही अतिरिक्त सुरक्षा म्हणून वसूल करण्यात येईल व ती बॅक गॅरटी किंवा एफ डी. स्वरूपात घेण्यात येईल.
2. ही अतिरिक्त सुरक्षा राशी काम पूर्ण झाल्यावर दोष दायीत्व कालावधी संपुष्टात आल्यानंतर आणि काम गुणवत्तापूर्वक आढळल्यानंतर परत करण्यात येईल.

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 305**:— महाराष्ट्र शासनाचे धोरणानुसार दिव्यांगाना व्यवसाय सुरू करण्याबाबत गांधीबाग, नंगा पुतळा, देविच्या मंदिराच्या लगतची १० x ६ फुटाची जागा अकरा महिण्याचे अस्थायी भाडेपट्टयावर श्री. सतिश सेवकराम भिसीकर आणि छाया सेवकराम भिसीकर यांना रू. १,२२६/— प्रतिमाह जागा वापर शुल्क आकारून ११ महिन्याचे अस्थायी भोडपट्टयावर देण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 306**:— प्रभाग क्र. 53 अ—ब येथील बाजीप्रभु नगर आणि रामनगर मैदाना जवळील रस्त्यांचे डांबरीकरणाचे काम करण्याच्या कामास्तव रू. 29,97,263/— च्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 307**:— प्रभाग क्र. 63 (अ व ब) गुरूदेव नगर, अयोध्यानगर, बिडीपेठ, सुभेदार ले—आऊट, ठवरे कॉलनी, व संजय नगर रस्त्यांचे डांबरीकरणाचे काम करण्याच्या कामास्तव रू. २९,९८,९५४/— च्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 308</u>:–** प्रभाग क्र. 43, अ/ब मधील दत्तनगर आणि कुंभारटोली येथे सी सी. रोडचे बांधकाम करण्यास्तव रु. 29,99,797/– राशीचे प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

सदर कामाकरिता मा. अध्यक्ष, स्थायी समिती यांनी पद क्र. A22001330803 मधून आर्थिक वर्ष 2016–17 मध्ये रु. 15.00 लक्ष प्रती नगरसेवक राशी तरतूद उपलब्ध करुन दिलेली आहे.

**<u>ठराव क्रमांक 309</u>:–** प्रभाग क्र. ४०–ब जलालपूरा येथे स्केटींग ग्राऊंड निर्माण करण्याचे कामास्तव तयार केलेल्या रू. २५,५९,४१३/– रकमेच्या प्राकलनास जूने पद क्र. ७६९ व नविन पद क्र. A46101373208 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 310</u>:–** मौजा –सिताबर्डी येथील नागपुर महानगर पालिकेच्या मालकीच्या गिता ग्राऊंड अभिन्यासातील भुखंड क्र. ५ (जुनी आनंद टाकीज) येथील ८२४८.००चौ.फुट जागा व त्यावरील अंदाजे १३९० चौ. मी. बांधकामासह प्रस्तावित रू.९,८६,०८,१०७/–चे अधिमुल्य राशी आकारून ३० वर्षीय स्थायी भाडेपट्टयावर देण्याबाबत निविदा मागविण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन निविदाद्वारे न करता जाहीर लिलावाद्वारे करण्यात यावा या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 311</u>:–** प्रभाग क्र. ४१ अ महाल येथे निशिसेल ते वाकर रोडपर्यंत आपदेव नाल्याचे बांधकाम करण्याचे कामास्तव तयार केलेल्या रू. २९,९९,३५२/– रकमेच्या प्राकलनास जूने पद क्र. ६१८ व नविन पद क्र. A43901370812 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 312</u>:–** प्रभाग क्र. 70 ब, गोपाल नगर अंतर्गत संभाजीनगर, बंडु सोनी, ले– आऊट, सुभाष नगर, लोखंडे नगर, गजानन नगर, नेल्को सोसा., सरस्वती विहार व इतर ठिकाणी रस्त्यांचे डांबरीकरणाचे कामास्तव प्र ाप्त निविदापैकी में. सेठ कंस्ट्रक्श ान हयांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 3.5 टक्के अधिक दराची निविदा रु. 49,19,634/– ( रूपये एकोण पन्नस लक्ष ऐकोणविस हजार सहाशे चौतीस रूपये फक्त ) स्विकृत करण्याचा प्रश्न विचारात घेणे हे काम पद क्रमांक 681 (A22001330802) अंतर्गत प्रस्तावित आहे. तरतुद मुक्त करण्याच्या मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन कार्यालयाने केलेल्या सुचनेप्रमाणे विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 313</u>:–** गांधीसागर तलाव, चाचा नेहरू बालोद्यान परिसर, गणेशपेठ येथे सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम करण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रू. 27,37,935/– (सत्ताविस लक्ष सदतिस हजार नऊशे पस्तीस ) च्या प्राकलनास मान्यता प्रदान करून महाराष्ट्र शासन निर्णय क्र.मु.सा.शौ,–1000/सं. क्र.–241/प्र.क्र.13/पा.पु. –21, मंत्रालय, मुंबई 32, दि. 30 ऑगस्ट 2001 अन्वये सदर्हु काम मेहतर समाज मागासवर्गीय सर्वांगीण विकास संस्था या संस्थेकडुन शासन निर्णय क्र. गवसु/1088/सी.आर. 2018, भा.ग. –2/का–7, मंत्रालय, मुंबई –32, शुध्दीपत्रक दि. 05 नोव्हेंबर 1998 नुसार निविदा/आवेदनाची अट शिथील करून प्राकलनिय दर अधिक 15 टक्के

कार्यान्वयन शुल्कासह आणि करारनाम्या प्रमाणे अग्रीम देवून त्यांचे मार्फत "पैसे द्या व वापरा" तत्वावर सार्वजनिक शौचालय बांधणे व 30 वर्षाकरीता संचालन करणे व देखभाल करणे इत्यादी कामे करण्यास व आयव्यय पद क्र. ए 44501372305 मधून तरतूद मुक्त करण्यास मंजूरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 314** :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर